# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं १६/२०१८**

| | |
|---|---|
| १. सी.ए. डॉ. बोर्गीकर वामन विठ्ठलराव | तक्रार अर्जदार |
| विरूध्द | |
| १.श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर<br>२.राजेरामराव महाविद्यालय, जत, जि. सांगली | वि. प. |

तक्रारीचे स्वरूप :

अर्धवेतनी रजेच्या नियमांचे उल्लंघन करून ४५ दिवसांची वैद्यकीय रजा नामंजूर केली आहे व सदरचा पगार थांबविण्यात आला आहे. ही रजा बिनपगारी करण्यासंबंधी संस्थेने कळविले आहे. अर्धवेतनी रजा पूर्ण वेळ शिक्षकाच्या निम्मे म्हणजे दहा दिवस म्हणजे (१वर्षासाठी) जमा दाखवली आहे; परंतु पूर्णवेळ शिक्षकाप्रमाणे दुप्पट खर्ची टाकण्यात आली आहे. दोन्हीकडे नियम समान पद्धतीने वापरलेले नाहीत. सबब सदरचा पगार रोखून माझ्यावर अन्याय झाला आहे. जर जमा होताना निम्मे होत असतील तर खर्ची पडतानाही निम्मेच पडले पाहिजेत. म्हणजेच घेतलेल्या रजेच्या निम्मे करून दुप्पट खर्ची टाकले पाहिजेत.

तक्रारदार यांनी नमूद केलेल्या माहितीनुसार तक्रारदार यांची नेमणूक दि. ०९/०७/१९८६ रोजी झाली. तक्रारदार राजेरामराव महाविद्यालय जत, जि. सांगली येथे सहयोगी प्राध्यापक (अर्धवेळ), अकौन्टन्सी या पदावर नियुक्ती झाल्याचे नमूद केले आहे. तक्रारदार यांनी तक्रारीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत.

- परिनियमातील तरतूद नमूद केली आहे. S.200 (A) Leave rules applicable to full time teachers.
- महाविद्यालयाने तक्रारदार यांना दि. ०९/१०/२०१५ रोजी वैद्यकीय रजेबाबत कळविलेल्या पत्राची प्रत.

- श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी यांनी प्राचार्य राजेरामराव कॉलेज, जत यांना प्राध्यापक डॉ. बोर्गीकर डब्ल्यू. व्ही. यांच्या वैद्यकीय रजेबाबत दि. १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी कळविलेल्या पत्राची प्रत.
- उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांनी वैद्यकीय रजा कालावधीतील वेतनाबाबत महाविद्यालयाचा अभिप्राय डॉ. बोर्गीकर डब्ल्यु. व्ही. यांना दि. ०१ डिसेंबर, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली प्रत.
- दि. २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी प्राचार्य राजेरामराव महाविद्यालय, जत यांनी उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डॉ. बोर्गीकर यांच्या वैद्यकीय रजा कालावधीतील वेतनाबाबत पाठविलेल्या पत्राची प्रत.

तक्रारदार यांनी त्यांच्या प्रतिनिधीद्वारे लेखी पत्रे समितीसमोर सादर केली आहेत, परंतु तक्रारदार सुनावणीसाठी समितीसमोर एकदाही उपस्थित राहिलेले नाहीत. तक्रारदार यांना अनेक वेळेस संधी देऊनही समितीसमोर उपस्थित राहून आपले म्हणणे मांडलेले नाही.

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज व लेखी पत्रांमधून दिलेले निवेदन अवलोकनी घेतले असता तक्रारदार यांनी खालील बाबी मांडल्या आहेत.

१. अर्धवेतनी रजा जमा करताना तक्रारदार अर्धवेळ अध्यापक असलेने पूर्णवेळ अध्यापकाचे निम्मे म्हणजे २० दिवसांच्या ऐवजी १० दिवस जमा केले आहेत. (शिवाजी विद्यापीठ स्टॅटयूट क्रमांक २०० B (e)1).

२. परंतु खर्ची टाकताना पूर्णवेळ अध्यापकाप्रमाणे जेवढे दिवस घेतली त्याच्या दुप्पट खर्ची टाकले आहे. (शिवाजी विद्यापीठ स्टॅटयूट क्रमांक २०० B (e) 3).

३. या दोहोंमध्ये विसंगती दिसते पहिला नियम अर्धवेळ प्रमाणे व दुसरा नियम पूर्णवेळ प्रमाणे.

४. परंतु तक्रारदार अर्धवेळ प्राध्यापक असलेने आठवडयातून फक्त तीन दिवस वर्कलोड असल्याने तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी घेतलेली रजा अर्धवेतनीच आहे, त्यामुळे जेवढी रजा घेतली ती दुप्पट होत असलेने तेवढीच वजावट करणे आवश्यक आहे

किंवा जमा होताना प्रतिवर्षी २० दिवस जमा करून मग घेतलेली रजा दुप्पट करून वजावट करणे आवश्यक होते.

५. अर्धवेळ अध्यापकासाठी वेगळे नियम केलेले नाहीत तसेच कोणतेही नियम लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे. अद्यार्थी नियम वापरणे चुकीचे आहे असे तक्रारदार यांचे लेखी पत्रांमधून कथन दिसून येते.

डॉ. बोर्गीकर यांच्या तक्रार अर्जाबाबत प्राचार्य, राजेरामराव महाविद्यालय, जत यांनी मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांचेकडे अभिप्राय कळविला आहे. तसेच प्रस्तुत समितीसमोर संस्था व प्राचार्य यांनी तोंडी म्हणणे मांडले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. होनगेकर समितीसमोर उपस्थित होते. डॉ. बोर्गीकर यांनी तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे अर्धवेळ शिक्षकाकरिता लेखी तरतूद परिनियमामध्ये नमूद नाही. त्यामुळे नियमांचे उल्लंघन होत नाही. प्रमाण संहितेतील नियम क्र. ३० (अ) व शिवाजी विद्यापीठ स्टॅटयूट क्र. २०० (e) (1) नुसार पूर्णवेळ कर्मचाऱ्यांना दरवर्षी २० दिवस अर्धवेतनी रजा मिळते. डॉ. बोर्गीकर हे अर्धवेळ असल्याने त्यांना १० दिवस अर्धवेतनी रजा मिळते.

प्रमाणसंहितेतील नियम क्र. ३१ (१—अ) व शिवाजी विद्यापीठ स्टॅटयूट क्र. २०० (e) (3) नुसार अर्धवेतनी रजा उपभोगताना एका दिवसाला दुप्पट अर्धवेतनी रजा खर्ची टाकावी लागते. म्हणजेच पूर्णवेळ कर्मचाऱ्यास दरवर्षाच्या २० अर्धवेतनी रजा दुप्पटीने खर्च करून १० दिवस पूर्ण पगारी रजा उपभोगता येते. डॉ. बोर्गीकर हे अर्धवेळ असल्याने त्यांना दरवर्षी मिळणाऱ्या १० अर्धपगारी रजा दुप्पटीने खर्ची टाकून ५ दिवस रजा उपभोगता येते. यामुळे पूर्णवेळ कर्मचाऱ्यास १० दिवस व अर्धवेळ कर्मचाऱ्यास ५ दिवस रजा मिळतात. यात कुठेही तक्रारदार डॉ. बोर्गीकर यांच्यावर अन्याय होतो असे महाविद्यालयाच्या प्रशासनास वाटत नाही.

डॉ. बोर्गीकर हे दरवर्षी मिळणाऱ्या १० अर्धवेतनी रजा एका दिवसाला एक दिवस खर्ची टाकून दरवर्षी १० दिवस रजा उपभोगण्यास मिळावी अशी मागणी करतात, असे केल्याने पूर्णवेळ आणि अर्धवेळ कर्मचाऱ्यांच्या रजेमध्ये कोणताही फरक राहणार नाही. डॉ. बोर्गीकर हे अर्धवेळ शिक्षक असल्याने त्यांना पूर्णवेळ शिक्षकांच्या निम्मीच रजा देता येते असे महाविद्यालयाचे म्हणणे आहे.

डॉ. बोर्गीकर यांनी या महाविद्यालयाची मातृसंस्था श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्याकडेही तक्रार अर्ज पाठविला. प्रशासकीय स्तरावर महाविद्यालयानेही संस्थेचे मार्गदर्शन मागितले असता या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणेच अर्धवेतनी रजा दुप्पट खर्ची टाकून रजा द्याव्यात असे संस्था प्रशासनाचे पत्र क्र. ८७०५ दि. १६/११/२०१५ ने महाविद्यालयाच्या प्रशासनास कळविले आहे.

डॉ. बोर्गीकर यांच्या सेवापुस्तकातील नोंदीनुसार त्यांनी दि. १६/०४/२०१५ अखेर १०२ दिवस वैद्यकीय रजा घेतल्या त्या दुप्पट खर्ची टाकून त्यांच्या दि. ३१/१२/२०१५ पर्यंतचा सर्व २०४ दिवस अर्धपगारी रजा संपलेल्या आहेत. त्यांच्या नावे अर्धपगारी रजा शिल्लक नसल्यामुळे त्यांनी दि. १४/०९/२०१५ ते दि. २६/१०/२०१५ पर्यंत घेतलेल्या वैद्यकीय रजा बिनपगारी होत असल्याने त्यांच्या या कालावधीतील वेतन त्यांना देता येणार नाही असे महाविद्यालयातर्फे म्हणणे मांडले. त्यामुळेच त्यांना वरील कालावधीतील वेतन देण्यात आलेले नाही.

समितीची निरीक्षणे:

तक्रारदार यांची नेमणूक अर्धवेळ असलेने शिक्षक परिनियमामध्ये अर्धवेळ शिक्षकांकरिता रजेबाबत तरतूद नाही. रजा ही हक्क म्हणून मागणी करू शकत नाहीत, तथापि संस्थेने दि. १६/११/२०१५ च्या पत्रामध्ये कळविलेनुसार सेवापुस्तकातील शिल्लक रजेचा तपशील पहाता (—४) रजा शिल्लक असल्याचे महाविद्यालयाचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांच्या वरील कालावधीच्या ४५ दिवसाच्या वैद्यकीय कारणास्तव पगारी वैद्यकीय रजा मंजूर करता येणार नाहीत. यास्तव त्यांचेकडून पगारी वैद्यकीय रजा शिल्लक नसलेने वरील कालावधीच्या वैद्यकीय कारणास्तव बिनपगारी रजा मागणी अर्ज घेण्यासाठी महाविद्यालयाने कळविले होते. अर्धवेतनी रजेच्या नियमांचे उल्लंघन करून ४५ दिवसांची वैद्यकीय रजा नामंजूर केली व सदरचा पगार रोखून तक्रारदार यांच्यावर अन्याय झाला असे म्हणणे नियमास धरून नाही. तक्रारदार डॉ. बोर्गीकर यांचे संस्थेने आर्थिक नुकसान केले असल्याचे दिसून येत नाही.

## आदेश

सबब प्रस्तुत तक्रारदारांचा तक्रार अर्ज नामंजूर करणेत येत आहे. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना देवून तसे कळविण्यात यावे.

दि. २१/०५/२०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**अध्यक्ष**
**(श्री. ना. गुं. पाटील)**

**सदस्य**
**(श्री. अ. अ. कुलकर्णी)**

**सदस्य**
**(श्री. प्र. द. राऊत)**

**सदस्य**
**(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती. अ. अ. कदम)**